# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.08.2025** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधान आजपासून जपान आणि चीनच्या दौऱ्यावर
2. 2030 पर्यंत पंतप्रधान स्वनिधी योजनेला मुदतवाढ
3. छत्तीसढमध्ये 30 नक्षलींनी केले आत्मसमर्पण
4. महाराष्ट्रातील पालघरमध्ये इमारत कोसळून 15 जणांचा मृत्यू आणि
5. जम्मू आणि काश्मीर तसंच उत्तर पंजाबमधील पुरस्थितीत सुरक्षादलांचं युध्दपातळीवर बचावकार्य

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 15 व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आज संध्याकाळी जपानच्या दौऱ्यावर जाणार आहेत. पंतप्रधान मोदींचा हा आठवा जपान दौरा असेल आणि जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्याशी विविध विषयांवर चर्चा होणार आहे. दोन्ही पंतप्रधान भारत आणि जपानमधील संरक्षण, व्यापार आणि अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि दोनही देशांमधील लोकांमधील देवाणघेवाण यासह विशेष धोरणात्मक आणि जागतिक स्तरावरील मुद्यांचा आढावा घेतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, पंतप्रधान मोदी, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी 31 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर दरम्यान चीनला जातील. या परिषदेत सहभागी होणाऱ्या अनेक नेत्यांशी द्विपक्षीय बैठका घेण्याची शक्यता आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी काल फिनलँडचे पंतप्रधान अलेक्झांडर स्टब यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. फिनलंड हा युरोपियन संघटनेतील महत्वाचा भागीदार आहे. दोन्ही नेत्यांनी व्यापार, तंत्रज्ञान आणि शाश्वतता यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य मजबूत करण्याच्या मुद्यांवर चर्चा केली. अशी माहिती मोदींनी समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.

**मंत्रीमंडळ निर्णय**

पथविक्रेत्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या आत्मनिर्भर निधी अर्थात पंतप्रधान स्वनिधी योजनेच्या पुर्नरचनेला केंद्रिय मंत्रीमंडळाने काल मान्यता दिली. तसंच मंत्रिमंडळाने कर्ज देण्याचा कालावधी 31 डिसेंबर 2024 नंतर वाढवण्यासही मान्यता दिली आहे. कर्ज देण्याचा कालावधी आता 31 मार्च 2030 पर्यंत वाढविण्यात आला आहे. योजनेचा एकंदर खर्च सात हजार 332 कोटी रुपये इतका आहे. पुनर्रचित योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात कर्जाची रक्कम वाढवणं, दुसऱ्या कर्जाची परतफेड केलेल्या लाभार्थ्यांसाठी UPI-लिंक्ड रुपे क्रेडिट कार्डची तरतूद, किरकोळ आणि घाऊक व्यवहारांसाठी डिजिटल स्वरुपातील पैसे परत मिळण्याच्या प्रक्रियेला प्रोत्साहन यांचा समावेश आहे. या पुर्नरचनेमुळे यापुर्वी नोंदणी झालेल्या 15 लाख आणि 50 लाख नव्यानं व्यवसाय सुरु करणाऱ्या लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था**

भारतीय अर्थव्यवस्था आणि उद्योग मजबूत आहेत. केंद्र सरकार आपल्या देशातील नागरिकांच्या हिताचेच निर्णय घेईल असा विश्वास परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी काल व्यक्त केला. नवी दिल्ली एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी ते बोलत होते. अमेरिकेनं भारतीय वस्तूंवर 50 टक्के आयातशुल्क लादल्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. आपण आत्मनिर्भर असलंच पाहिजे मात्र आंतरराष्ट्रीय व्यापार हा कुठल्याही दबावाखाली नाही तर स्वेच्छेनं झाला पाहिजे असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी काल नवी दिल्लीत व्यक्त केलं. राष्ट्रीय स्वयंसेवक

संघाच्या शताब्दीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेच्या कालच्या सत्राला संबोधित करताना ते बोलत होते. स्वावलंबन ही सर्व समस्यांची गुरुकिल्ली आहे त्यामुळे त्यांनी स्वदेशी उत्पादनांना प्राथमिकता द्यावी असं आग्रही प्रतिपादनही त्यांनी केलं.

**मुले-आधार**

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणानं देशभरातील शाळांना 5 ते 15 वर्षे वयोगटातील मुलांसाठी आधार अनिवार्य बायोमेट्रिक माहिती वेळेत अद्ययावत करण्यास सांगितले आहे. प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश कुमार यांनी यासंदर्भात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून या माहिती संकलनासाठी शिबिरं आयोजित करण्याची विनंती केली आहे. प्राधिकरण आणि शालेय शिक्षण विभागाच्या या संयुक्त उपक्रमाद्वारे देशभरातील 17 कोटी बालकांची बायोमेट्रिक्स माहिती अद्ययावत करणं सोपं होईल अशी अपेक्षा आहे.

**जनधन**

प्रधानमंत्री जन धन योजनेला आज 11 वर्षे पूर्ण होत आहेत. जगातील सर्वात मोठ्या आर्थिक समावेशक उपक्रमांपैकी एक अशा या योजनेची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट 2014 या दिवशी केली होती. प्रधानमंत्री जन धन योजना ही व्यापक आर्थिक समावेशकतेसाठी एक राष्ट्रीय अभियान असून देशातील सर्व कुटुंबांना बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी त्यात एकात्मिक दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे.

**अमेरिका**

अमेरिकेत मिनियापोलिसमधील एका चर्चवर झालेल्या गाळीबारात 2 बालकांचा मृत्यू झाला आणि 17 जण जखमी झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रार्थनासभेदरम्यान चॅपलच्या खिडक्यांमधून हल्लेखोराने गोळीबार केला आणि नंतर आत्महत्या केली. 17 जखमींमध्ये 14 बालकांचा समावेश आहे. 23 वर्षांचा हल्लेखोर रॉबीन वेस्टमनकडे एक बंदूक, शॉटगन आणि पिस्तूल अशी शस्त्र सापडली आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मिनियापोलिसमधील गोळीबारातील बालकांना आदरांजली म्हणून 31 ऑगस्ट रोजी व्हाईट हाऊस आणि सर्व सार्वजनिक इमारतींवर तसेच सर्व अमेरिकन दूतावास आणि जागतिक स्तरावरील अमेरिकन लष्करी ठिकाणांवरही आदरांजली वाहण्याचे आणि अमेरिकन ध्वज अर्ध्यावर उतरवण्याचे निर्देश दिले आहेत.

**गणेशोत्सव**

भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या मूहुर्तावर काल महाराष्ट्रात घरगुती तसंच सार्वजनिक मंडळांमध्ये विघ्नहर्त्याची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**गडचिरोली-नक्षलवादी**

महाराष्ट्रात, गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातल्या भामरागड तालुक्यातल्या कोपर्शी गावातल्या जंगलामध्ये पोलिसांशी झालेल्या चकमकीत काल चार नक्षलवादी ठार झाले. यामध्ये एक पुरुष आणि तीन महिलांचा समावेश आहे. छत्तीसगडमध्ये, काल विजापूर जिल्ह्यात 30 माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. त्यापैकी 20 जणांवर 81 लाख रुपयांचे रोख बक्षीस होते. आत्मसमर्पण केलेले माओवादी विविध घटनांमध्ये सहभागी होते. अशी माहिती विजापूरचे पोलीस अधिक्षक जितेंद्र यादव यांनी दिली. राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत त्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्यात आले.

**इमारत-पालघर**

महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातल्या विरारमध्ये चार मजली इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत 15 जणांचा मृत्यु झाला आहे. मंगळवारी रात्री 12 वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. महानगरपालिका आणि एन.डी.आर.एफ ची दोन पथकं ढिगाऱ्याखालून नागरिकांना शोधण्याच्या कामात गुंतली होती. या इमारतीचा मागील भाग खाली असलेल्या चाळीवर कोसळून ही दुर्घटना घडली. ती चाळ पूणपणे उध्वस्त झाली आहे. या इमारतीमधील 50 पैकी अंदाजे 12 सदनिका कोसळल्याचं वृत्त आहे.

**मुंबई उच्च न्यायालय-आराधे**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाजमाध्यमांवर काल ही माहिती दिली आहे. पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून विपुल पांचोली यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या नावाची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे.

**बॅडमिंटन**

पॅरिसमध्ये सुरु असलेल्या बॅडमिंटन जागतिक अजिक्यपद स्पर्धेत भारताच्या पुरुष दुहेरीची जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी आणि ऑलिंपिक पदक विजेती पीव्ही सिंधू यांनी काल या स्पर्धेच्या 16 व्या फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत नवव्या मानांकित सात्विक-चिराग जोडीने चिनी तैपेईच्या लिऊ कुआंग हेंग आणि यांग पो हान यांचा 22-20, 21-13 असा पराभव केला. महिला एकेरीत, पीव्ही सिंधूने मलेशियाच्या करुपाथेवन लेत्शाना हिचा 21-19, 21-15 असा पराभव केला. आज, एच.एस. प्रणॉय पुरुष एकेरीच्या पुर्व उपांत्यपूर्व फेरीसाठीचा सामना खेळेल. रोहन कपूर आणि रुत्विका शिवानी गड्डे मिश्र दुहेरीत खेळतील.

**पूर**

पंजाबमध्ये पूरस्थितीचा अद्यापही गंभीर आहे. गुरुदासपूर, फिरोजपूर, फाजिल्का, कपूरथला, अमृतसर, होशियारपूर आणि तरनतारन जिल्ह्यांमध्ये अनेक गावं आणि शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. भारतीय लष्कर, वायु दल, सीमासुरक्षा दल आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, पंजाब पोलिस आणि स्थानिक स्वयंसेवक अडकलेल्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. सध्याच्या परिस्थितीमुळे रेल्वेनं 65 गाड्या रद्द केल्या आहेत. पठाणकोट, लुधियाना, जालंधर आणि अमृतसर इथं मदत केंद्रं स्थापन करण्यात आली आहेत. जम्मू आणि कश्मिरमधील जम्मू भागात तसंच उत्तर पंजाबमध्ये पाऊस आणि पूराचं पाणी नाढत आहे. या भागात हवाई दल युध्दपातळीवर मदत आणि बचावकार्य करत आहे. अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे दिली आहे. हिमाचल प्रदेशात, भूस्खलन आणि पुरामुळे दोन राष्ट्रीय महामार्ग आणि 528 रस्ते वाहतुकीसाठी बंद आहेत. छत्तीसगढ, कर्नाटकातील किनारी भाग, मध्य महाराष्ट्र आणि उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार